देशोन्नती

# पंतप्रधानांनी संवाद साधल्याने महिला भारावल्या

- आत्मसन्मान मिळाल्याची भावना
- नारीशक्तीची अलोट गर्दी
- लखपती दिदींचा सन्मान

देशोन्नती वृत्तसंकलन

जळगाव : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जळगाव येथे देशातील निवडक लखपती दिदींशी संवाद साधला. लखपती दिदी योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलांविषयी त्यांनी संवादाच्या माध्यमातून जाणून घेतले. 'लखपती दिदी योजनेमुळे महिला बचतगटांना मिळालेल्या आर्थिक, व्यावसायिक सहाय्य व प्रशिक्षणामुळे आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो. त्याबरोबर आम्हाला आत्मसन्मान ही मिळाला.' अशी भावना लखपती दिदींनी यावेळी व्यक्त केली. जिल्हाभरातून सुमारे अठीच हजार बसेसमधून महिला वर्ग या संमेलनासाठी उपस्थित होता. संमेलन संपल्यानंतर जळगाव विमानतळ ते अजिंठा चौक दरम्यान महिलांची अलोट गर्दी उसळली होती. तब्बल तास दोन तास वाहतूक ठप्प झाली होती.

जळगाव विमानतळासमोरील प्राइम इंडस्ट्रियल पार्क मैदानावर झालेल्या लखपती दिदी संमेलनापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील निवडक अशा ८० लखपती दिदींशी संवाद साधला. या लखपती दिदी संवाद कार्यक्रमात देशातील वेगवेगळ्या राज्यातील बँक सखी दिदी, ड्रोन दिदी, पशु दिदी, कृषी दिदी म्हणून नावारूपाला येऊन लखपती झालेल्या महिला उपस्थित होत्या. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे ग्रामविकास, पंचायत राज व पर्यटन मंत्री गिरीश महाजन आदी उपस्थित होते.





## ■ उघड्या जीपमधून भगिनींना अभिवादन

पंतप्रधान मोदी यांचे कार्यक्रमस्थळी उघड्या जीपमधून आगमन झाले. यावेळी त्यांनी उपस्थित हजारो भगिनींना अभिवादन केले आणि त्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार केला. कार्यक्रमस्थळी उभारलेल्या मंडपामधून मोदी यांनी फेरी मारली. यावेळी उत्साहाने भारलेल्या वातावरणात उपस्थित भगिनींनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ना. रक्षा खडसे त्यांच्यासोबत उपस्थित होते. तत्पूर्वी पंतप्रधानांनी लखपती दिदिंशी संवादही साधला.

### लखपती दिदींचा सन्मान

दरम्यान, आजच्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील वंदना पाटील, मनीषा जगताप, ज्योती ताडे, सीमा कावळे, रमा ठाकूर यांच्यासह शीतल नारेट (हिमाचल प्रदेश), महबूबा अख्तर (जम्मू काश्मीर), गंगा अहिरवार (मध्य प्रदेश), एस. कृष्णवेणी (तेलंगणा) आणि नीरज देवी (उत्तर प्रदेश), सेरिंग डोलकर (लडाख) यांना पंतप्रधानांच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी बचतगटाच्या ४८ लाख महिलांना २५०० कोटी रुपयांच्या फिरत्या निधीचे वितरण करण्यात आले.

### पंतप्रधानांची भाविकांना आदरांजली

पंतप्रधान मोदी यांनी, नेपाळमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या यात्रेकरूंबाबत दु:ख व्यक्त केले. याप्रकरणी केंद्र आणि राज्य शासनाने तातडीने पावले उचलली. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांना तातडीने नेपाळला पाठविले. या दुर्घटनेत जखमींवर चांगले उपचार सुरू आहेत. मृतांच्या कुटुंबियांना केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने मदत देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## ■ संत मुक्ताबाई, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व कवयित्री बहिणाबाईंचा गौरवपूर्ण उल्लेख

महाराष्ट्र ही राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जन्मभूमी आहे. या राज्याला मातृशक्तीचा समृद्ध आणि गौरवशाली वारसा लाभला आहे. त्याचा प्रत्येक ठिकाणी वेळोवेळी प्रत्यय येतो. अठीकडेच पोळा हा सण या संस्कृतीचे दर्शन घडले. जळगाव जिल्हा सुद्धा संत मुक्ताबाई यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांची गोडी आजही प्रत्येकाच्या ओठावर असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी आवर्जून नमूद केले.

## ■ देशाच्या विकासात महाराष्ट्राचे मोठे योगदान

महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे. रोजगार आणि गुंतवणूकदार यांचे लक्ष येथे असते. देशाच्या विकासात महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे या प्रयत्नासाठी राज्य शासनाला सर्वतोपरी मदत केली जाईल. यासाठी महाराष्ट्रात महायुतीचे स्थिर सरकार येण्याची गरज आहे. यासाठी माता व बहिणी आम्हाला साथ देतील असा मला विश्वास आहे, असेही पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले.

## ■ महिला बचतगटांना ड्रोन पायलट बनविणार

महिला बचतगटांना ड्रोन पायलट बनविणार असल्याचे सांगून त्यासाठीचे प्रशिक्षण त्यांना देण्यात येईल. आधुनिक शेतीसाठी महिलांना प्रेरित करण्यात येईल. यासाठी महिलांना कृषी सखी करून रोजगार वाढविण्यावर भर राहील. महिलांसाठी अर्थसंकल्पात ३ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सेनादलात महिलांचा समावेश केला गेला आहे. स्टार्टअप क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

देशोन्नती

# नारीशक्तीने पंतप्रधानांच्या पाठिशी उभे रहावे - शिवराजसिंह चौहाण

देशोन्नती वृत्तसंकलन



जळगाव : विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महिलांनी ताकदनिशी पंतप्रधानांच्या पाठिशी उभे रहावे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंग चव्हाण यांनी लखपती दिदी मेळाव्यात केले.

या मेळाव्यात बोलताना शिवराजसिंग म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे स्वप्न पाहिले आहे ते पूर्ण करण्यासाठी सर्व महिलांनी एकजुटीने त्यांच्या पाठिशी उभे रहावे, असे सांगून ते म्हणाले महिलांच्या डोळयात अश्रू राहू नये म्हणून लखपती झालेल्या महिलांनी गरीब महिलांना साथ द्यावी आणि गाव गरीबीमुक्त होईल, असे प्रयत्न करावेत. कारण पंतप्रधान मोदी यांनी या देशातील महिला अधिक शक्तीनीशी व्हाव्यात म्हणून सतत प्रयत्न केले आहेत. रात्रभर पाऊस पडूनदेखील मोठ्या संख्येने महिला या मेळाव्याला उपस्थित राहिल्या याचा आनंद आहे, असे सांगून ना. शिवराजसिंग म्हणाले एक करोड महिला पंतप्रधानांमुळे लखपती दिदी झाल्या. त्यात अधिक ११ लाख महिला जुडल्या आहेत. त्यांना लखपती करण्याचे स्वप्न त्यांचे आहे. त्यासाठी महिलांनी संकल्प करून एकजुटीने त्यांना साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. प्रत्येक क्षेत्रात महिलांचा पुढाकार राहिला आहे. म्हणून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी देखील सरकारची आहे. नेपाळ येथे झालेल्या दुर्घटनेच्यावेळी केंद्रीय युवक क्रीडामंत्री ना. रक्षा खडसे या तातडीने पोहचल्या याचा त्यांनी आर्वजुन उल्लेख केला.

# देशोन्नती







संमेलनाचे उद्घाटन करतांना पंतप्रधान नरेंद्र मोदी, सोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, शिवराजसिंह चौहाण, ना. रक्षा खडसे, ना. गिरीश महाजन, ना. गुलाबराव पाटील, आ. राजुमामा भोळे, दुसऱ्या छायाचित्रात लखपती दिदींशी संवाद साधताना पंतप्रधान तर शेवटच्या छायाचित्रात दैनिक देशोन्नतीचे सामूहिक वाचन करतांना म्हसूर व गाजी सरपंच राजेश्वर पाटील, भानुदास चव्हाण व नेरी, म्हसूर येथील ग्रामस्थ.

## नेपाळ अपघातातील मयतांच्या नातेवाईकांना पाच लाखाची मदत- *मुख्यमंत्री*

देशोन्नती वृत्तसंकलन



जळगाव : देश महासत्ता बनण्यासाठी महिलांच्या सहभागाची गरज असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य सरकारने महिलांसाठी विविध कल्याणकारी योजनांचा लाभ महिलांनी घ्यावा, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केले. दरम्यान, नेपाळ येथे झालेल्या बस अपघातात मयत झालेल्या जळगाव जिल्ह्यातील भाविक भाविकांच्या नातेवाईकांना राज्य सरकारतर्फे पाच लाख रुपये मदतीची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

जळगाव येथील प्राईम इंडस्ट्रीअल पार्क येथे ; विमानतळ परिसर; देशभरातील लखपती दीदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पंतप्रधान मोदी बोलत होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहाण, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी, केंद्रीय राज्यमंत्री कमलेश पासवान, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ, आमदार संजय सावकारे, सुरेश भोळे, किशोर पाटील, मंगेश चव्हाण, आमदार लता सोनवणे यावेळी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, आजच्या विराट जनसागराने सर्व विक्रम मोडले असून, पंतप्रधान मोदी यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी विक्रमी संख्येने महिला उपस्थित आहेत. देशाचे पंतप्रधान पदाची धुरा तिसऱ्यांदा मोदी यांनी स्वीकारली याचा आनंद आहे. सोन्याच्या या भूमित लाडक्या बहिणी या सोन्यासारख्या आहेत. त्यांच्यासाठी अनेक योजना असून, त्याचा लाभ घेण्याचे त्यांनी सांगितले.

महिलांच्या खात्यात जमा होणार रक्कम

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले लाडकी बहिण योजनेची रक्कम महिलांच्या खात्यात जमा होईल, यात शंका नाही. महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत कोट्यावधी महिला लखपती होणार यात कोणतेही मतभेद नाही. देश महासत्ता करण्यासाठी आणि महिला अधिक सक्षम व्हाव्यात म्हणून सरकारच्या विविध योजना आहेत. देशातील संपूर्ण महिला या पंतप्रधानांच्या पाठिशी उभ्या आहेत. महिलांना तीन सिलेंडर, मुलींना मोफत शिक्षण, प्रवासात सवलत आदी योजनेचा महिलांनी लाभ घेण्याचेही त्यांनी सांगितले.

### महिलांना लखपती करण्याचे ध्येय - अजित पवार

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी एवढ्या मोठ्या संख्येने महिला उपस्थित राहिल्याचे आपण आपल्या राजकीय जीवनात प्रथमच पाहिले आहे. राज्यातील महिला लखपती बनविण्याचा संकल्प पंतप्रधानांनी हाती घेतला आहे. ३ कोटी महिलांना लखपती बनविणार असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, महाराष्ट्रातील महिलांनी नेहमी साथ दिली आहे. महिलांना लखपती दिदी बनविण्याचे स्वप्न पंतप्रधान मोदी यांचे असून, ते पूर्ण करण्यासाठी सर्व महिलांनी एकजुटीने त्यांना साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. ना. अजित पवार यांनी मनोगत प्रथम हिंदी भाषेतून व्यक्त केले. त्यानंतर ते मराठीत बोलले.

### नार-पारचे पाणी मिळणार - देवेंद्र फडणवीस

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषणात सांगितले की, नारीशक्तीचा विकास कोणी रोखू शकत नाही. पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महिलांनी साथ द्यावी, असे सांगून त्यांनी बचत गटांच्या माध्यमातून ७५ लाख महिलांचे कुटुंबीय जुळले आहेत. मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगात भारताचा विकास करायचा असेल तर सर्वांनी त्यांना साथ द्यायला हवी. अद्वितीय विकास साधण्याचे काम पंतप्रधानांनी केले आहे. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी केले. या जिल्ह्याला नार - पार योजनेचे पाण्यासाठी निर्णय घेण्यात आला असून, यात कुठलेही दुमत नसल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जळगाव जिल्ह्याला नार - पार योजनेमुळे सुजलाम - सुफलाम करण्याचे काम सरकार करत आहे, असे सांगून त्यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडले.